● गुरुवार, दि ३ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ७२ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## ‘तो’ लोखंडी सळईचा माल मध्यप्रदेशातून जप्त

### स्थानिक गुन्हे शाखा व चंदनझिरा पोलीसांची संयुक्त कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** येथील भाग्यलक्ष्मी कंपनीमधून मध्यप्रदेशात जाणारा १९.८८० टन लोखंडी सळईचा एक ट्रक हा ड्रायव्हर व ट्रक मालकाच्या संगनमताने परस्पर विक्री करुन अपहार व आर्थिक फसवणुक झाल्याच्या तक्रारीनंतर चंदनझिरा पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मध्यप्रदेशातून लोखंडी सळईचा माल जप्त केला आहे. १५ लाख ६१ हजार ३१९ रुपये किमतीचा हा माल पोलीसांनी ताब्यात घेतला आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, दिनांक २४/०९/२०२४ रोजी सायंकाळी ०५.00 वाजेच्या दरम्यान ट्रक क्रमांक RJ09GC1900 भाग्यलक्ष्मी कंपनी जालना येथुन ट्रक ड्रायव्हर शौकत हुसेन एजाज हुसेन रा.उज्जैन मध्यप्रदेश हा एकुण १९.८८० टन लोंखडी सळई ज्याची किमंत १५६१३१९/- रु.चा माल ट्रकमध्ये भरुन मध्यप्रदेशकडे निघाला होता. सदरचा माल हा वेळेत समोरच्या एजन्सीकडे पोहोच न करता ट्रक चालक व ट्रक मालक इरफान खान या दोघांनी संगनमत करुन लोखंडी सळईच्या म ालाची परस्पर विक्री करुन मोबाईल बंद करुन कोठेतरी निघुन गेले या प्रकरणी पोलीस ठाणे चंदनझिरा येथे कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस प्रशासनाच्यावतीने बुधवार (दि २) प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळवण्यात आले की, स्थागुशा व चंदनझिरा पो. ठाण्यातील पथक यांनी दिनांक २९/०९/२०२४ रोजी मध्यप्रदेश राज्यातील जिल्हा शाहजापुर, मोहन बडोदीया पोलीस स्टेशन हद्दीत पान २ वर

## हे शेतकऱ्यांचे सरकार - आ. लोणीकर

### केंद्र व राज्यातील सरकार शेतकऱ्यांसाठी सदैव तत्पर १००% अनुदानावर शेतकऱ्यांना बॅटरी पंप

**मंठा । प्रतिनिधी -** मतदारसंघातील हजारो गोरगरीब निराधार विधवा दिव्यांग परित्यक्ता दुर्धर आजारग्रस्त यांना अधिकाधिक लाभ कसा मिळवून देता येईल यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केला असून या सर्व गोरगरीब निराधार बंधू भगिनींच्या आशीर्वाद सातत्याने माझ्या पाठीशी आहेत त्यामुळेच मी शेतकरी कुटुंबात जन्माला आलेलो असताना देखील सरपंच पदापासून आमदार व राज्याच्या कॅबिनेट मंत्री पदापर्यंत मजल मारू शकलो माझ्या या यशामध्ये निश्चितपणे या सर्व बंधू भगिनींचा आशीर्वाद सातत्याने माझ्या पाठीशी आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

मंठा येथील माऊली मंगल कार्यालय येथे आयोजित संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत पेन्शन मंजुरी आदेश वाटप बालसंगोपन योजनेअंतर्गत अनाथ बालकांना पेन्शन मंजुरी आदेश वाटप तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत मंठा तालुक्यातील सह्याद्री लोकसंचालित साधन केंद्र मंठा व मातोश्री रमाई लोकसंचालित साधन केंद्र तळणी यांच्या अंतर्गत येणाऱ्या महिला बचत गटांना २ कोटी ५० लाख रुपयांच्या कर्ज मंजुरी आदेशाचे वाटप आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते आज करण्यात आले त्याचप्रमाणे कृषी कार्यालय मंठा या ठिकाणी एकात्मिक कापूस व सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य विकासासाठी विशेष कृती योजना अंतर्गत ११०० फवारणी पंपाचे वाटप करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

संजय गांधी निराधार योजना श्रावणबाळ वृद्धापकाळ पेन्शन योजना इंदिरा गांधी वृद्धापकाळ पेन्शन योजना यांच्या माध्यमातून सर्वसामान्य कामगार कष्टकरी कुटुंबातील तसेच दारिद्र रेषेखालील कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक विधवा दिव्यांग परित्यक्ता दुर्धर आजारग्रस्त निराधार यासारख्या ८०६ लाभार्थ्यांना म ाजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या पुढाकाराने आज मंजुरी आदेशपत्राच वाटप करण्यात आले यावेळी काही प्रकरणे प्रलंबित असून त्या प्रलंबित प्रकरणांना देखील तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी



प्रशासनाला दिल्या.

बाल संगोपन योजनेअंतर्गत मंठा तालुक्यातील ८८ अनाथ बालकांना प्रति महिना २२०० पेन्शन मंजूर करण्यात आली असून १८ प्रस्ताव नव्याने दाखल करण्यात आले आहेत यामध्ये ज्या मुला मुलींना आई नाही किंवा वडील नाही किंवा आई-वडील दोन्ही नाहीत अशा अनाथ बालकांना त्यांच्या शिक्षणाचा उपजीविकेचा खर्च भागवता यावा यासाठी प्रति महिना २२०० रुपये पेन्शन महाराष्ट्र सरकारच्या वतीने देण्यात येते परतुर विधानसभा मतदारसंघात ३०० पेक्षा अधिक लाभार्थ्यांचा व्यक्तिशः आमदार बबनराव लोणीकर यांनी शोध घेतला असून या सर्व मुला मुलींना ही पेन्शन प्रत्यक्षात सुरू करण्यात आली आहे या अनाथ मुलांसाठी म ाझ्या आयुष्यात मी काहीतरी करू शकलो याचा मला मनस्वी आनंद आहे असेही यावेळी लोणीकर यांनी स्पष्ट केले

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की भारत देश हा एक कृषिप्रधान देश असून शेती करत असताना शेतकऱ्यांना विविध अवजारांची किंवा उपकरणांची सतत गरज पडते. शेतकऱ्यांना अवजारांची पूर्तता होईल या अनुषंगाने महाराष्ट्र सरकार कृषि विभागांतर्गत शेतकऱ्यांसाठी वारंवार नवीन योजना राबवत असते.याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि नाविन्यपूर्ण योजनेची सुरुवात केली आहे असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले

शेतकऱ्याचे पीक जोमात येते. शेतकऱ्यांना शेती करताना विविध अवजारांची गरज भासत असते. यात अवजारातून शेतकरी शेती पिकांसाठी शेतात मेहनत घेतात. त्याचबरोबर सध्या रासायनिक खतांचा शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. तसेच सेंद्रिय खतांचा देखील शेतकरी वापर करतात. कीड अळीसाठी शेतकऱ्यांना पिकावर फवारणी करावी लागते. त्यासाठी शेतकऱ्यांना फवारणी पंपाची गरज आता शेतकऱ्यांना बॅटरी फवारणी पंप १००% अनुदानावर दिला जातो आहे. असेही तुम्ही शेतकऱ्यांसाठी ही योजना कृषी विभागामार्फत म हाडीबीटी पोर्टलवर राबवण्यात येत असून शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत बॅटरी पंप आणि स्प्रे पंप पान २ वर



**माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या प्रयत्नातून जालना येथे शासकीय वैद्यकीय म हाविद्यालय मंजूर झाल्याबद्दल श्री खोतकर यांचा भाग्यनगर येथे व्यापारी महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष विनीत साहनी, विजय राठोड, इंद्रर तवरावाला, विनोद पवार, ॲड. ईश्वर बिलोरे, शुभम राऊत, मेघराज चौधरी यांच्यासह विष्णु पाचफुले व व्यापारी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

## महापुरुषांचे योगदान देशाला विसरून चालणार नाही - प्रा. सुनील बनसोडे

### टेंभुर्णी येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालयात, महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय श्रीमती जे बी के विद्यालय टेंभुर्णी येथे आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य नंदकुमार काळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक तथापंप प्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, धनंजय पुराणे, हे होते. सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आलं. कार्यक्रमात प्राध्यापक सुनील बनसोडे यांनी हे देशाला विसरून चालणार नाही. महात्मा



गांधींचे अहिंसात्मक तत्व, तर लालबहादूर शास्त्री यांचे जवान आणि किसान याबद्दलचा असलेला प्रेम तसेच त्यांच्याबद्दलच्या भावना, तसेच दोन्ही महापुरुषांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांनी वापर केला. तसेच गौरव इंगळे मी लालबहादूर शास्त्रीच्या जीवनावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन भीवसान ससाने. या कार्यक्रमास सखाराम बोरकर, दिनकर उखर्डे, गणेशसंवसाक्के, कैलास जाधव,दगडोबा तांबेकर, गजानन धोटे, दीपक देशमुख, नागोराव देशमुख, आदींची उपस्थिती होती.

युवा आदर्श

### शक्तीप्रदर्शन ...

**शक्ती प्रदर्शन नको**
**रे राजीनामा दिला**
**सत्ता स्थानी बसावे**
**मार्ग सुखकर खुला**
**विचारांती सर्वंकष**
**निर्णय घेतला भला**
**विशाल करूनि मन**
**बाजूला ठेवी भाला**
**निरभ्र केले आकाश**
**निर्मळ प्रकाश आला**
**संशयाने डागाळली**
**सत्ता नको ती मला**
**बाळासाहेबी आदर्श**
**दिला खरा दाखला**
**किंतू परंतु नको बा**
**गळून पडती शृंखला**
**हातात सुपूर्त चाव्या**
**नवा धनी कुलूपाला**
**समस्या सोडवा सर्व**
**यायचे नावारूपाला**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## खेळाच्या माध्यमातून ऐक्य व राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण होते

### माजी प्राचार्य डॉ भागवतराव कटारे यांचे प्रतिपादन; आंतर महाविद्यालयीन कब्बडी स्पर्धेत जालना टीम विजेता तर बीड टीम उपविजेता

**घनसावंगी । प्रतिनिधी -** मॉडेल कॉलेज घनसावंगी येथे आंतर महाविद्यालयीन विभागीय महिला कबड्डी स्पर्धेत जालन्याचा संघ विजयी.मॉडेल कॉलेज घनसावंगी येथे मुलींच्या अंतर महाविद्यालयीन विभागीय कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्नः छत्रपती संभाजी नगर, बीड ,धाराशिव जालना संघाने नोंदविला सहभाग,विद्यापीठाचा संघ तयार प्रतिनिधी घनसावंगीः डॉ बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संचलित मॉडेल कॉलेज घनसावंगी येथे अंतर महाविद्यालयीन विभागीय महिलांच्या कबड्डी स्पर्धा दिनांक १ ऑक्टोबर रोजी संपन्न झाल्या उद्घाटक म्हणून माजी प्राचार्य डॉ भागवतराव कटारे हे होते अध्यक्षस्थानी प्राचार्य भारत खंदारे हे होते. विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण व दीप प्रज्वलनाने कार्यक्रम ाची सुरुवात झाली यावेळी उद्घाटन पर भाषणात प्राचार्य डॉ भागवत राव कटारे म्हणाले की मनुष्याच्या जीवनामध्ये खेळाचे अनन्यसाधारण महत्त्व असून खेळामुळे माणूस शारीरिक सुदृढ तर होतोच परंतु मानसिक सुद्धा मजबूत होतो तसेच या मातीतून विविध खेळाडूंनी आपले नावलौकिक केलेला आहे. खेळ ही एक संस्कृती असून खेळ भावना मनात ठेवून खेळाडूंनी समर्पण भावनेने खेळ खेळावा खेळातूनच सामाजिक एकतेची सांस्कृतिक, विविधतेची व राष्ट्रीय एकात्मतेची भावना खेळाडूंमध्ये निर्माण होते व राष्ट्रांमध्ये सुद्धा राष्ट्रीय भावना व एकात्मतेची शिकवण खेळ भावनेतून



निर्माण होते. यश अपयश जय पराजय हा खेळाचा भाग आहे. ग्रामीण भागात सुद्धा प्रतिभावान खेळाडू आहेत आणि मुलींच्या या कबड्डी स्पर्धेमुळे निश्चितच घनसावंगी तालुक्यातील क्रीडा क्रीडा नव चालना मिळेल. आज खेळाडूंना व्यावसायिक व राज्य राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय तथा विविध लीगमध्ये नावलौकिक प्राप्त करता येऊ शकतो. जीवनामध्ये चैतन्य व आनंद निम ाण करण्यामध्ये खेळाची भूमिका मोलाची आहे. देशाची प्रगती सुद्धा खेळा वरती अवलंबून आहे पान २ वर

## मराठवाडा शिक्षक संघाचे लक्षवेधी धरणे आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** माऊंट कार्मेल कॉन्व्हेंट उच्च माध्यमिक शाळा जि चंद्रपूर या शाळेचे फाउंडेशन अहमदाबाद या संस्थेस हस्तांतरण बाबतच्या शासन निर्णया विरोधात व श्री एम एस जैन इंग्लिश स्कूल बंद करण्याच्या व्यवस्थापनाच्या निर्णयाविरुद्ध शाळा वाचवा देश वाचवा मोहिमे अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि ४ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ४ ते ६ दरम्यान मराठवाडा शिक्षक संघ लक्षवेधी धरणे आंदोलन करणार आहे त्याचप्रम ाणे शासनाने नुकतेच काढलेल्या आदेशानूसार २० किंवा२० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळेवरून नियमित शिक्षकाची बदली करून त्या जागेवर कंत्राटी शिक्षक नेमण्याचा घाट घातला आहे नव्हे तसा शासनादेश सुद्धा काढला आहे आणि त्याची अंमलबजावणी लगेचच होणार आहे त्यामुळे अशा शाळेवरच्या नियमित शिक्षकाची बदली केल्यास बरेच शिक्षक अतिरिक्त होण्याची शक्यता आहे याच कारणाने मराठवाडा शिक्षक संघाने या बाबीची गंभीर दखल घेऊन शिक्षकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध व शासनाच्या कंत्राटीकरण धोरणाच्या विरोधात जोरदार आंदोलन पान २ वर




**जालना तालुक्यातील मौजे बाजीउम्रद येथील श्रीकृष्ण नामदेव डोंगरे यांना राष्ट्रपतींच्या हस्ते वसंतराव नाईक शेती मित्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल श्री डोंगरे यांचा जालन्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष तथा भाजपाचे जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांनी सत्कार करुन अभिनंदन केले. यावेळी पांडुरंग पोहेकर, संजय डोंगरे, तुकाराम डोंगरे, अनिल खंडागळे, नागेश अंभोरे, कृष्णा गायके, गजानन आढाव उपस्थित होते.**

# संपादकीय

## साहित्यातील मिरासदार

मराठी साहित्यातील जेष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांचा काल म्हणजे २ ऑक्टोबर रोजी तिसरा स्मृतीदिन होता. तीन वर्षापूर्वी म्हणजे २ ऑक्टोबर २०२१ रोजी त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारी पर्वाचा अंत झाला असेच म्हणावे लागेल. द. मा. मिरासदार हे मराठीतील प्रख्यात विनोदी लेखक व कथाकथनकार होते. १४ एप्रिल १९२७ रोजी त्यांचा जन्म झाला. द. मा मिरासदार यांचे पूर्ण नाव दत्ताराम मारुती मिरासदार असे होते मात्र ते द. मा या नावानेच प्रसिद्ध झाले. द. मा मिरासदार यांनी १९५२ साली अध्यापन क्षेत्रात प्रवेश केला. पुण्याच्या कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत ते शिक्षक होते. त्याआधी काही काळ त्यांनी पत्रकारिताही केली. १९६२ सालापासून त्यांनी कथाकथनास सुरवात केली. द. मा मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील यांनी ६० च्या दशकात संपूर्ण महाराष्ट्रभर कथाकथनाचे प्रयोग केले. त्यांच्या कथाकथनाने महाराष्ट्राला अक्षरशः भुरळ घातली. द. मा मिरासदार हे विनोदी कथा सादर करायचे. त्या कथांचे लेखनही त्यांनीच केलेले असायचे. द. मा मिरासदार यांच्या भुताचा जन्म, माझ्या बापाची पेंड, व्यंकुची शिकवणी, शिवाजीचे हस्ताक्षर, माझी पहिली चोरी, हरवल्याच्या शोध या विनोदी कथा श्रोत्यांनी अक्षरशः डोक्यावर घेतल्या. द. मा. मिरासदार यांची कथा सादर करण्याची शैली खुमारदार होती. आपल्या खुमारदार शैलीत कथा सादर करत त्यांनी महाराष्ट्राला लोटपोट हसवले. द. मा. मिरासदार यांनी विपुल प्रमाणात लेखन केले. विनोदी कथा ही त्यांची खासियत होती. द. मा. मिरासदार यांचे २४ कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय त्यांनी १८ चित्रपटांच्या पटकथाही लिहिल्या आहेत. एक डाव भुताचा या चित्रपटाची कथा- पटकथा लेखन त्यांनी केले आहे इतकेच नाही तर या चित्रपटात त्यांनी अभिनयही केला आहे. द. मा मिरासदार यांच्या विनोदी कथा ग्रामीण जीवनावर आधारित असत. ग्रामीण जीवनातील विसंगतीचे, विक्षिप्तपणाचे, इरसालपणाचे दर्शन त्यांच्या कथांतून घडत. त्यांनी केवळ विनोदीच नाही तर स्पर्श, विरंगुळा, कोणे एके काळी यासारख्या गंभीर कथाही लिहिल्या. द. मा. मिरासदार यांच्या अनेक कथांवर चित्रपट निघाले. त्यांच्या काही कथांचा समावेश शालेय अभ्यासक्रमातही करण्यात आला. त्यांना मानाचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात जी पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरून न निघणारी अशीच आहे. द. मा. मिरासदार यांच्या निधनाने मराठी साहित्यातील मिरासदारीच संपली आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. द. मा. मिरासदार यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# कोकण रेल्वेचे भारतीय रेल्वेत विलीनीकरण ही काळाची गरज!

## अखंड कोकण रेल्वे प्रवासी सेवा समितीची पत्रकार परिषद

**मुंबई । प्रतिनिधी -** कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (KRCL) ची स्थापना १९९० मध्ये तत्कालीन रेल्वे मंत्री, कै.जॉर्ज फर्नांडिस आणि अर्थमंत्री, कै. मधु दंडवते यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली बांधा-वापरा-हस्तांतरित करा (BOT) तत्त्वावर करण्यात आली. यात भारतीय रेल्वे ५१%, महाराष्ट्र २२%, कर्नाटक १५%, गोवा ६% व केरळ ६% असा आर्थिक वाटा होता. मूळ करारानुसार १५ वर्षे किंवा सर्व देणी देऊन झाल्यावर यांपैकी जे आधी होईल तेव्हा कोकण रेल्वे भारतीय रेल्वेत विलीन होणे अपेक्षित होते. परंतु, २००८-०९ मध्ये केंद्र सरकारने कोकण रेल्वे सर्व देणी देऊन झाल्यावरही स्वतंत्रच राहील असे ठरवले. यामुळे एकप्रकारे संस्थापकांच्या मूळ उद्देशाला हरताळ फासला गेला आहे.




आता महामंडळ स्थापन करण्याचा उद्देश सफल होऊन २५-३० वर्षांनंतरही कोकण रेल्वेचा कारभार स्वतंत्रच असून केवळ आपल्याला मिळणाऱ्या नफ्याच्या जोरावर हे महामंडळ केवळ रेल्वे चालवण्याखेरीज इतर पायाभूत सुविधांच्या वाढीसाठी लक्षणीय कामगिरी करू शकत नाही. बांधकाम खर्च अधिक असल्यामुळे १९९३ मध्ये कोकण रेल्वे मार्गावर रोहा - वीर आणि मंगळुरु - उडुपी मार्गावर प्रवासी वाहतूक सुरु झाल्यापासून सादर मार्गावर प्रवासी वाहतुकीसाठी ४०% तर मालवाहतुकीसाठी ५०% अधिभार लागू केला गेला. १९९८ मध्ये संपूर्ण मार्ग सुरु झाल्यावर हा अधिभार संपूर्ण मार्गाला लागू करण्यात आला. परंतु आज ३१ वर्षांनंतरही हा अधिभार तसाच असून तो काढण्याची गरज आहे असे मत सचिव अक्षय महापदी यांनी व्यक्त केले. गेल्या १० वर्षांत आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेला भरीव निधी मिळून अभूतपूर्व सुधारणा सुरु आहेत. वर्ष २०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात भारतीय रेल्वेला २,६२,२०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. परंतु केवळ वेगळ्या पद्धतीच्या व्यवस्थापन संरचनेमुळे कोकण रेल्वेला अर्थसंकल्पातून भरीव लाभ मिळालेला नाही. संपूर्ण देशात नवीन रेल्वेमार्ग, दुहेरीकरण, चौपदरीकरण, यांसारखे प्रकल्प भरभरून सुरु असताना १७/०९/२०१८ ला केंद्रीय रेल्वेमंत्रालयाकडे देण्यात आलेल्या कोकण रेल्वेच्या केवळ १४१ किलोमीटर दुहेरीकरण प्रस्तावाला संबंधित राज्य शासन निधी देत नाहीत म्हणून रेल्वे बोर्डाने आणि केंद्रीय अर्थ मंत्रालयाने २७/०२/२०२३ म्हणजेच तब्बल ४ वर्षे उलटून गेल्यावर नकार कळवला. पंतप्रधानांनी ६ ऑगस्ट, २०२३ ला उदघाटन केलेल्या अमृत भारत स्थानक योजनेत कोकण रेल्वेवरील एकाही स्थानकाचा समावेश नव्हता. भारतीय रेल्वेवर जास्त प्रवासी वाहतूक असणाऱ्या मार्गांचे उच्च-घनता मार्ग आणि अति गर्दीचा मार्ग असे वर्गीकरण केले जाते. यात मुंबई दिल्ली, मुंबई चेन्नई यांसारख्या मार्गांचा समावेश आहे. परंतु, वर्षभर प्रवाशांची गर्दी असूनही कोंकण रेल्वे मार्ग केवळ स्वतंत्र कारभारामुळे या वर्गीकरणांपासून मुकला आहे, ज्यामुळे महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांना अडथळा निर्माण होतो. निधीच्या कमतरतेमुळे आजही कित्येक महत्वाच्या स्थानकांवरील फलाटांवर पूर्ण छप्पर नाही, काही ठिकाणी दोन फलाटांना जोडणारा पूल नाही, काही ठिकाणी फलाटच नाहीत. २९ मे, २०२४ च्या आर्थिक अहवालानुसार कोकण रेल्वेवर एकूण ७३३७ कोटी रुपयांची दायित्वे आहेत. त्यात १५०० कोटी रुपयांच्या बाँडचा समावेश आहे. पुढील चार ते पाच वर्षांत बाँडचे पैसे परत करायचे असून ९०० कोटी इतकी रक्कम जुलै आणि ऑगस्ट २०२४ मध्येच देय होती. त्यासाठी पुन्हा भरीव निधीची आवश्यकता भासणार आहे असेही अक्षय महापदी म्हणाले.

२०१६-१७ पासून कोकण रेल्वेचे अधिकृत भागभांडवल ४००० कोटी रुपये इतके आहे, मूळ भागधारक टक्केवारीचा विचार केल्यास भारतीय रेल्वे २०४० कोटी, महाराष्ट्र ८८० कोटी, गोवा २४० कोटी, कर्नाटक ६०० कोटी आणि केरळने २४० कोटी देणे आहेत, त्याअर्थी राज्य शासनांनी कोकण रेल्वेतून बाहेर पडणेच हिताचे आहे. अन्यथा संबंधित शासनांना वेळोवेळी निधीचे वितरण करावे लागणार आहे. दुहेरीकरणाच्या कामासाठी कर्नाटक शासनाने निधी देण्यास असमर्थता दर्शवली आहे. इतर राज्यांनी केंद्रीय मंत्रालयाने निधीबाबत वारंवार स्मरणपत्रे दिल्यावरही त्यांना उत्तर न दिल्यामुळे तो टप्पा दुहेरी करणाचा प्रस्तावच रद्द करण्यात आला. बॉन्डचे पैसे परत करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी कोकण रेल्वेने सर्व भागधारकांना विनंती केली होती, परंतु, महाराष्ट्राने तसे करण्यास नकार दिला. तर राज्य शासनांनी आपापल्या हिस्सेदारी नुसार निधी उपलब्ध करून दिल्यावरच निधी देण्याची भूमिका केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने घेतली. रेल्वे मंत्रालयाकडून कोकण रेल्वेला मिळणारा निधीही कर्ज स्वरूपातच मिळतो. निधीची कमतरता भासली म्हणून बॉन्ड किंवा इतर स्वरूपात कर्ज आणि ते फेडण्यासाठी पुन्हा नवीन कर्ज अशा दुष्टचक्रात कोकणची ही रेल्वे अडकली आहे.

यामुळे कोकणातील रेल्वे विकास अडकून पडला आहे. २५ वर्षांपूर्वी उभारलेल्या मार्गावर केवळ ४६ किलोमीटर दुहेरी मार्गाची भर घालतानाही कर्जच काढावे लागले.असे मत राजू कांबळे यांनी व्यक्त केले. कोकण रेल्वे महामंडळाला अर्थसंकल्पीय तरतूद नसल्याने त्याचा थेट परिणाम कोकणातील विकासावर होत आहे, त्याचे जिवंत उदाहरण हे सावंतवाडी टर्मिनस आहे, टर्मिनस ला मंजूर रक्कम ही १८ कोटीच्या वर असून ही ती कामे गेली १० वर्षे अपूर्णच आहे, त्यामुळे हे महामंडळ भारतीय रेल्वेत विलीन होणे ही काळाची गरज आहे असे मत सागर तळवडेकर यांनी उपस्थित केले. यावेळी अखंड कोकण रेल्वे प्रवासी सेवा समिती चे अध्यक्ष शांताराम नाईक, सचिव अक्षय महापदी, कोकण रेल्वे प्रवासी संघटना सावंतवाडीचे सागर तळवडेकर, कोकण रेल्वे प्रवासी सेवा समितीचे राजू कांबळे, जनजागृती सेवा संस्थेचे श्री गुरुनाथ तिरपणकर, अखिल कोकण विकास महासंघचे तानाजी परब, ड राणे, कोकण गणेशभक्त प्रवासी समितीचे दीपक चव्हाण, वैभववाडी विकास मंचचे विठ्ठल तळेकर, मराठा ऑर्गनायझेशन चे प्रमोद सावंत, मुंबई गोवा महामार्ग जन आक्रोश चे संजय सावंत, कोकण रेल्वे प्रवासी संघटना वैभववाडीचे सूर्यकांत मुद्रस, मिलिंद रावराणे, तसेच समितीचे सल्लागार सुरेंद्र नेमळेकर, श्रीकांत सावंत, सावंतवाडी संघटनेचे गणेश चमणकर, स्वप्नील नाईक, विनोद नाईक आदी उपस्थित होते.

# सहशिक्षीका संतोषी बांगर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी -** सौ संतोषी बांगर या गायत्री विद्यामंदिर येथे गेली २९ वर्ष ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत होत्या. विद्यार्थी पटसंख्या घडल्यामुळे त्या अतिरिक्त होऊन त्याचे समायोजन सध्या सह्याद्री विद्यामंदिर प्राथमिक विभाग या ठिकाणी झालेले असून त्या ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आहेत. संतोषी बांगर यांना या पूर्वीही अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक कार्याची दखल घेऊन त्यांना पाक्षिक आदर्श रायगड वृत्तपत्र व वृत्तवाहिनी यांच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित सामाजिक ,शैक्षणिक, साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना मानाचा समजला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात येते . सौ. संतोषी संपत बांगर यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला.

हा कार्यक्रम अंबरनाथ येथे दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता स्वामी समर्थ मंगल कार्यालय रोटरी क्लब वडवली (पूर्व )या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास उपस्थित मान्यवर. श्री. आमदार - डॉक्टर बालाजी केणीकर साहेब, अंबरनाथ विधानसभा - आमदार-श्री ज्ञानेश्वर म्हात्रे साहेब, (कोकण विभाग )आमदार ऍडव्होकेट - श्री.निरंजन डावखरे साहेब (कोकण पदवीधर मतदारसंघ) मा. स्नेहल ताई माणिक जगताप (महाड नगरपरिषद )मान. नगराध्यक्ष मान .सौ प्रेरणा वैभव गावकर कुलकर्णी प्रेरणा फाउंडेशनच्या संस्थापक. रवींद्र मालुसरे (मराठी वृत्तपत्र लेखक मुंबई संगम) इत्यादी उपस्थित होते.या




मान्यवरांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास सौ.बांगर यांच्या सोबत त्यांचे संपत बांगरही उपस्थित होते. सौ.बांगर यांनी आपल्या कुटुंबीयांचे तसेच शुभेच्छा रुपी आशीर्वाद देणाऱ्या गायत्री विद्या मंदिर व सह्याद्री विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक बंधू भगिनी यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# बॉलीवूडच्या ज्यूनिअर आर्टिस्ट असोसिएशन अध्यक्षपदी शेट्टी



मुंबई चित्रपट उद्योगातील सर्वात प्रतिष्ठित संस्थांपैकी एक असलेल्या जूनियर आर्टिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी आकाश शेट्टी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आकाश शेट्टी गेल्या पंधरा वर्षांपासून चित्रपट वितरणात काम करत आहे आणि दक्षिण बाजारातील अनेक ब्लॉकबस्टर बॉलीवूड चित्रपटांच्या वितरणाशी संबंधित आहे जूनियर आर्टिस्ट असोसिएशन ही ज्युनियर कलाकारांच्या हिताचे आणि अधिकारांचे रक्षण करते. राज बब्बर, पुरुषोत्तम सोळंकी यांसारख्या अनेक दिग्गजांनी यापूर्वी जूनियर आर्टिस्ट असोसिएशनचे अध्यक्षपद भूषवले आहे, आता आकाश शेट्टी संस्थेचे महत्त्वाचे कार्य आणि कार्य पुढे नेणार आहेत.

जूनियर आर्टिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी आकाश शेट्टी यांची नियुक्ती झाल्याबद्दल अंधेरी येथील जानकी हॉल रिक्रिएशन क्लब येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आकाश शेट्टी यांचा संस्थेच्या इतर प्रमुख अधिकारी व सदस्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी आकाश शेट्टी म्हणाला, मी जूनियर आर्टिस्ट असोसिएशनच्या सर्व सदस्यांचे आभार मानू इच्छितो. यावेळी ज्युनियर आर्टिस्ट असोसिएशनच्या सदस्यांसमोर अनेक आव्हाने आहेत. मी माझ्या असोसिएशनच्या हितासाठी काम करेन. मी सभासदांच्या हिताचे रक्षण करणार आहोत.

आकाश शेट्टी यांनी अत्यंत संवेदनशील काळात असोसिएशनच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्याने जूनियर कलाकारांच्या दैनंदिन देयकात दशकाहून अधिक काळ वाढ करण्यात आली नाही, तसेच ज्युनियर कलाकारांना संधी मिळण्यातही अडचणी येत आहेत.आकाश शेट्टी आणि समितीला या समस्यांचे निराकरण करण्याचा आणि सदस्यांच्या भल्यासाठी काही कठोर बदल घडवून आणण्याचा विश्वास आहे.

पान १ वरुन

## तो लोखंडी ...

गोयल एजन्सी मधुन गुन्ह्यातील अपहार झालेला मुद्येमाल जप्त केला आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशा चे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, चंदनझीरा पोलीस ठाण्याचे पो.निरि. पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपुत, पोलीस सपोउपनि मनसुब वेताळ, फुलचंद गव्हाणे, लक्ष्मीकांत आडेप, सुधीर वाघमारे, देविदास भोजने, रवी देशुमख, स्थागुशा व पोस्टे चंदनझिरा यांच्या पथकाने संयुक्त कारवाई केली आहे.

## हे शेतकऱ्यांचे ...

यासाठी १००% अनुदान दिले जात आहे. शेतकऱ्यांना आता १०० टक्के अनुदानावर बॅटरी पंप मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांची शेतीतील कामे लवकर होणार आहेत. या पंपाच्या माध्यमातून शेतकरी जलद गतीने पिकावर फवारणी करू शकतील असा विश्वास यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला

यावेळी गणेशराव खवणे संदीप भैया गोरे पंजाबराव बोराडे नागेशराव घारे गजानन देशमुख विठ्ठलराव काळे उद्धवराव गुंडगे दत्तात्राव कांगणे विलास घोडके प्रसादराव गडदे उपविभागीय अधिकारी श्री पद्माकर गायकवाड उपविभागीय कृषी अधिकारी श्री रोडगे गटविकास अधिकारी श्री गगनबोने तालुका कृषी अधिकारी श्री राजबिंडे महिला आर्थिक विकास महामंडळाचे श्री उमेश कहाते नायब तहसीलदार श्री काळदाते नायब तहसीलदार श्री कुलकर्णी दारासिंग चव्हाण गणेश चव्हाळ माऊली गोडगे कैलास चव्हाण नवनाथ खंदारे राजेभाऊ खराबे बाळासाहेब तौर सोपानराव वायाळ महेश पवार सोनाजी जाधव अन्साबाई राठोड जयश्री पवार नगरसेविका छाया वाघमारे आशामती लहाने लता राठोड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सहदेव मोरे पाटील यांनी केले तर प्रास्ताविक गटविकास अधिकारी श्री गगनबोने यांनी केले.

## खेळाच्या माध्यमातून ...

असे ते म्हणाले.यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ क्रीडा संचालक डॉ संदीप जगताप यांनी सांगितले की या मुलींच्या विभागीय कबड्डी स्पर्धा आयोजना बरोबरच विविध प्रकारच्या स्पर्धेचे आयोजन विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून करण्यात येणार आहे.क्रिकेट, कबड्डी, कुस्ती तसेच इतर खेळाडूंना साठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न आहेत अत्यंत प्रेरक विचार त्यांनी प्रस्तुत केले. अध्यक्षीय भाषणात डॉ भारत खंदारे यांनी खेळ व खेळाविषयी आपले विचार स्पष्ट करत या विभागीय स्तरावरील आयोजना बाबत कौतुक केले. प्राचार्य डॉ रामराव चव्हाण यांनी सांगितले की ग्रामीण विद्यार्थिनींच्या खेळ विषयक भावनेला गती मिळेल व अशा आयोजना मुळे क्रीडा संस्कृतीस बळकटी प्राप्त होईल इतका मोठ्या स्वरूपात आयोजन याबाबत करण्याची संधी विद्यापीठाने माननीय कुलगुरू महोदयांनी दिली त्याबद्दल त्यांनी आभार मानले. यावेळी डॉ भगवान सिंग बैनाडे, सिनेट सदस्य प्रा नाना गोडबोले, माजी नगराध्यक्ष राज देशमुख, डॉ बप्पासाहेब मस्के शारीरिक शिक्षण विभाग अभ्यास मंडळ सदस्य,,डॉ प्रशांत तौर डॉ भुजंग डावकर डॉ डॉ अभिजीत दिक्कत, डॉ सुरेश नलावडे विद्यापीठ निवड समिती सदस्य, डॉ वरकर डॉ लक्ष्मण जाधव पंच, योगेश गायके, डॉ आर पी.राठोड डॉ पाथरे पंच व निवड समिती सदस्य,डॉ अनिल पाटील, डॉ अरुणा दसपुते, संघ व्यवस्थापक, डॉ संध्या जगताप, डॉ भीमा माने, डॉ विजय लक्ष्मी मुंडे सह पत्रकार सुभाष बीडे, संपादक श्री नरेंद्र जोगड पोलीस ,सह मोठ्या संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी क्रीडा प्रेमी उपस्थित होते. यावेळी बीड छत्रपती संभाजी नगर धाराशिव व जालना या संघादरम्यान दोन-दोन राऊंड झाले व अंतिम सामना हा जालना विरुद्ध बीड या दोन संघादरम्यान झाला अत्यंत अटीतटीच्या या सामन्यात जालना संघाने बीड संघाचा पराभव केला व विभागीय मुलींच्या अंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेच्या चषकावर आपले नाव कोरले कडक ऊन असतानाही वातावरणात दमट असतानाही खेळाडूंनी जिगरबाज खेळ करत सर्वांची मने जिंकली पंच प्रशिक्षक त्यांनी मोलाची भूमिका बजावली. शेवटी विद्यापीठाचा संघ ही निवड समितीने निवडला. सूत्रसंचालन डॉ कन्नूलाल विटोरे व डॉ बाळासाहेब सोनवणे यांनी आभार डॉ सुनील तांगडे तथा प्रा खंडू नवखंडे यांनी मानले कार्यक्रमाचे साठी डॉ ज्ञानेश्वर खोजे डॉ भीमराव पूंडगे, प्रा भागवत गोरे,डॉ ऋषी बाबा शिंदे, प्रा.बाळासाहेब वरखडे ,डॉ संभाजी मराठे, श्री गणेश सुरासे, श्री नेमिनाथ मुळे,श्री आकाश कुरळे, विश्वजीत खोजे, ,अर्जुन साबळे ,गणेश तरगे आदींनी या स्पर्धेसाठी परिश्रम घेतले.

## मराठवाडा शिक्षक ...

करण्याचा इशारा दिला आहे या आंदोलनासाठी जिल्हाभरातून सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे व जिल्हा सचिव संजय येळवंते यांनी केले आहे.कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शिक्षण शिक्षण आणि शिक्षणाशी संबंधित घटकांची स्थिती यावर अवलंबून असते.ज्या देशांनी शिक्षणास उच्च प्राधान्य दिले ते देश जगात महासत्ता म्हणून उदयास आले.महाराष्ट्र राज्य प्रगत आणि पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. फुले,शाहू आंबेडकर यांनी रयतेच्या दुःखाचे कारण केवळ अज्ञान असल्याने त्यांनी सर्वांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले तसेच कर्मवीर भाऊराव पाटील,पंजाबराव देशमुख ,कर्मवीर मामासाहेब जगदाळे,कर्मवीर महर्षी धोंडो केशव कर्वे ,शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे यांनी शेवटच्या माणसापर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी जीवाचे रान केले. परंतु वर्तमान सरकारने हे धोरण उलटे फिरवून शिक्षणाची दारे गोरगरीब, कष्टकरी,शेतमजूर कामगार यांच्या मुलांना शाळेची दरवाजे बंद करण्याचा घाट घातला आहे त्यामुळे हे शिक्षणाचे खाजगीकरण, कंपनीकरण, कंत्राटीकरण या विरोधात एकीची वज्रमुठ आवळून हे निर्णय रद्द करून आपले आणि आपल्या भावी पिढ्याचे भवितव्य वाचवण्यासाठी दिनांक २७/९/२०२४ व १५ मार्च २०२४ चा संचमान्यतेचा शासन निर्णय त्याच पद्धतीने व्यवस्थापनाने दिलेला आदेश रद्द करण्यात यावा यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दिनांक ४ ऑक्टोबर २०२४ वार शुक्रवारला वेळ दु ४ ते ६ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय जालना या ठिकाणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित केले आहे.या आंदोलनासाठी जिल्हाभरातील सर्वच क्षेत्रातील शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी,पालक यांनी सहभाग नोंदवून आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे

## बालाजी मंदिर संभाजीनगर जालना येथे नवरात्र ब्रह्मोत्सवास आजपासून प्रारंभ

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील संभाजीनगर येथील बालाजी मंदिरात दिनांक तीन ऑक्टोबर गुरुवार पासून अंकुर अर्पण पूजनाने नवरात्र ब्रह्मोत्सवास प्रारंभ होणार आहे. तिरुपती येथील बालाजी पाठशालेतून प्रशिक्षित सहा स्वामींच्या मार्गदर्शनाखाली हा ब्रह्मोत्सव संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी बालाजी भगवान साठी पुष्पहार , प्रसाद बनवणारे तसेच वाद्यवृंद सुद्धा तिरुपती येथून आले आहेत. हा कार्यक्रम १० दिवस चालणार असून दैनिक अभिषेक सकाळी साडेसहा वाजता, दैनिक महाआरती, सकाळी नऊ वाजता उत्सव मूर्ती यज्ञ शाळा प्रवेश, साडेअकरा वाजता हवन पूर्णाहूती, बारा वाजता उत्सव मूर्ती अभिषेक, दुपारी साडेबारा वाजता मध्यान्ह आरती, संध्याकाळी सात वाजता हवन पूर्णाहुती, सायंकाळी साडेसात वाजता झुला उत्सव, आठ वाजता शोभायात्रा व रात्री साडेनऊ वाजता शयन आरती असे या कार्यक्रमाचे दैनंदिन वेळापत्रक असणार आहे. आठ ऑक्टोबर मंगळवार रोजी दुपारी दोन वाजता कल्याण उत्सव, ९ ऑक्टोबर बुधवार रोजी सकाळी साडेअकरा वाजता सरस्वती पूजन, १२ऑक्टोबर शनिवार रोजी सकाळी ११ वाजता महा पूर्णाहुती चक्रस्नान व सायंकाळी सात वाजता ध्वजाअवहोरण असे धार्मिक विधीचे कार्यक्रम होणार आहेत. १५ ऑक्टोबर गुरुवार रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे मुख्य यजमान माजी मंत्री व कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष माननीय अर्जुनरावजी खोतकर , स्वागत यजमान माननीय श्री प्रतीक दानवे पाटील, माननीय श्री शैलेश सुभाष चंद्रजी देविदान, नारायण दादा चाळगे हे असणार आहेत. तसेच राजुरी स्टील ग्रुप, सतीश कश्मीरी लाल अग्रवाल, श्री जगदीशजी खट्टर, श्री राजेशजी अग्रवाल, श्री हुकुमचंद रविराज पाटणी, कांतीलालजी राठी, सुखदेवजी जोधराजजी सराफ हे सर्व इतर कार्यक्रमाचे यजमान असून दैनिक भोजप्रसाद यजमान श्री जालना वस्तू भंडार असोसिएशन व महाप्रसाद यजमान श्री विठ्ठलराव त्र्यंबकराव घुले पाटील हे असणार आहेत. श्री संतोष जी मोहिते, श्री विष्णू सर्जे राव डोंगरे, हरिभाऊ बाबुराव नाटकर ,पाटील श्री प्रीतम वैजनाथआप्पा लोणगावकर, श्री बालाजी चंद्रभानजी गारखेडे हे विशेष लड्डू प्रसाद यजमान असणार आहेत. या व्यतिरिक्त जवळपास १४० पेक्षा जास्त बालाजी भक्त यजमान म्हणून आपले योगदान देणार आहेत . तरी सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक ब्रह्मोत्सव सेवा समितीचे अध्यक्ष त्रिभूवण राऊत, उपाध्यक्ष श्याम लोया, सचिव अंकुश राऊत व सदस्य आदींनी केले आहे.

# उत्सवाचे पावित्र्य जपण्यासाठी गरब्यात केवळ हिंदूंनाच प्रवेश द्या

### हिंदु जनजागृती समितीचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** नवरात्री हा श्री आदिशक्तीच्या उपासनेचा, मांगल्याचा आणि पावित्र्याचा सण आहे; पण आज देशभरात वाढत असलेले महिलांवरील अत्याचार, लाखोंच्या संख्येने महिला बेपत्ता होणे, 'लव्ह जिहाद'च्या माध्यमातून हिंदू युवतींना लक्ष्य करणे आदी अनेक प्रकार मोठ्या प्रमाणात उघडकीस येत आहेत. त्यामुळे नवरात्रोत्सवामध्ये लव्ह जिहाद्यांपासून महिलांची सुरक्षितता, तसेच उत्सवांचे पावित्र्य जपणे आवश्यक आहे. म्हणूनच ज्यांना मूर्तीपूजा मान्य नाही, अशांना नवरात्रीमध्ये देवीच्या मूर्तीसमोर गरबा खेळण्यासाठी प्रवेश देऊ नये. गरबा हा हिंदूंचा धार्मिक सण आहे. हिंदू देवतांवर श्रद्धा असणार्‍यांनीच तेथे यावे. जे मूर्तीपूजा न मानणारे गरब्यात शिरण्याचा प्रयत्न करतात, त्यातून पुढे 'लव्ह जिहाद'चा धोकाही निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे 'लव्ह जिहाद' रोखण्यासाठी आणि उत्सवाचे पावित्र्य जपण्यासाठी गरब्यात केवळ हिंदूंनाच प्रवेश द्यावा, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीने नवरात्रीनिमित्त गरबा आयोजन करणार्‍या सर्व आयोजकांना केले आहे.

या संदर्भात गुजरात, मध्यप्रदेश राज्यांसह महाराष्ट्र सोलापूर जिल्ह्यांतील पोलिसांनी महिलांची सुरक्षेसाठी प्रत्येकाचे आधारकार्ड पाहून प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे, त्याचे आम्ही मनापासून स्वागत करतो; मात्र हा नियम केवळ काही राज्ये वा जिल्ह्यांत नव्हे, तर संपूर्ण देशभरात लागू केला पाहिजे. आज देशभरात बेकायदेशीररित्या घुसखोरी केलेल्या बांगलादेशी आणि



रोहिंग्या मुसलमानांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या घुसखोरांचा गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभाग असल्याचे सुरक्षा यंत्रणांना आढळून आले आहे. हे अतिशय गंभीर असून नवरात्रोत्सवामध्ये काही घातपात करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे गरबा आयोजकांनी हा विषय गंभीरतेने घ्यायला हवा.

ज्या अहिंदूंना नवरात्रीमध्ये गरब्यात सहभागी व्हायचे असेल, तर प्रथम श्रद्धेने विधीवत प्रथम हिंदु धर्म स्वीकारावा. हिंदु देवतांची पूजाअर्जा करावी. तिलकधारण करून मग गरबोत्सवात सामील व्हावे. एरवी गणेशोत्सव, रामनवमी आदींच्या मिरवणुका निघतात, त्या वेळी चुकून अंगावर गुलाल पडला किंवा मोठ्या आवाजात लाऊड स्पीकर्स लावले अशा कारणांमुळे दंगली घडवणारे नवरात्रीच्या गरब्यात आनंदाने कसे काय सहभागी होतात, हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे कोणत्या हेतूने अहिंदु गरब्यात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतात, हे महत्त्वाचे आहे, याकडेही समितीने लक्ष वेधले.

नवरात्री म्हणजे नऊ दिवस देवीची भक्तीभावाने करायचे व्रत असून त्याचे पावित्र्य जपणे आवश्यक आहे. सध्या नवरात्रीमध्ये चित्रपटांतील अश्लील गाणी लावणे, त्यांवर हिडीसपणे नाचणे, महिलांची छेडछाड करणे, तोकडे कपडे घालून गरब्यात सहभागी होणे आदी प्रकार होतात. यांतून महिलांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते, त्यामुळे हे आपण टाळले पाहिजे. तसेच उत्सवांचे बाजारीकरण रोखण्यासाठीही प्रयत्न करायला हवेत, असेही समितीने म्हटले आहे.

## पाथ्रीकर कॅम्पसच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कब्बडी स्पर्धेत बाजी

**बदनापूर । प्रतिनिधी -** येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या कब्बडी संघाने आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत बाजी मारली असून विद्यापीठात हा संघ सर्वप्रथम आला आहे. ग्रामीण भागातील या महाविद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम राखत मिळवलेल्या या यशाबद्दल संघाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टद्वारे पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने कायम विविध क्रीडा प्रकारात बाजी मारलेली आहे. या महाविद्यालयातील कब्बडी संघाने मागील अनेक वर्षांपासून राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी केलेली आहे. प्रत्येक वर्षी या महाविद्यालयातील अनेक खेळाडू राष्ट्रीयस्तरावर चमकत असतात. ग्रामीण भागात असलेल्या या महाविद्यालयाने संस्थेचे अध्यक्ष डॉ.देवेश पाथ्रीकर व क्रीडा संचालक डॉ. एस. एस. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा क्षेत्रात प्रचंड दबदबा निर्माण केलेला आहे. या वर्षीची आंतर महाविद्यालयीन कब्बडी स्पर्धा अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे संपन्न झाल्या.



या स्पर्धेतही पाथ्रीकर कॅम्पसच्या संघाने पुन्हा बाजी मारली असून सांघीक खेळाच्या जोरावर बाजी मारत सर्वप्रथम क्रमांक मिळवला. या संघाला क्रीडा विभागप्रमुख डॉ. नाजमा खान यांचे मार्गदर्शन लाभले होते. तर या संघात पठाण सोहेल खान, आशीष विष्णू जाधव,नितीन जाधव, विनोद चव्हाण,समाधान थाले, जावेदखान पठाण, आशीष सिध्दार्थ जाधव, मदन लाला झा, साईराज कुंभार, कुशल अय्यर कीर्तीवासन अय्यर, शंकर भंडारे, सुभाष दलसिंग या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या यशाबद्दल संस्थेच्या सचिव डॉ. एम. डी. पाथ्रीकर, डॉ. राहुल हजारे, डॉ. पठाण, डॉ. गणेश गावंडे, डॉ. विजय राजाळे, डॉ. देवेंद्र देशमुख, डॉ. अशोक मुंडे, डॉ. हेमराज चोपकर, डॉ. जलबा नरवडे, सय्यद नजाकत, अमृत तारो, अशोक वरूडे, तेजराव कान्हेरे आदींनी अभिनंदन केले आहे.

## लॉयन्स क्लबतर्फे महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** लॉयन्स क्लब ऑफ जालनातर्फे महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील स्वच्छता अभियानावर विशेष लक्ष केंद्रित केल्याबद्दल याप्रसंगी जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते उदय शिंदे, रोटरी क्लबच्या स्वच्छता अभियानात सहभागी हेमंत ठक्कर तसेच १५ स्वच्छता कर्मचार्‍यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात स्वच्छतेबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येऊन महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. तसेच गांधीजींच्या स्वच्छ भारत या संकल्पनेवर भर देण्यात आला तर तर शास्त्रीजींच्या जय जवान, जय किसान या घोषणेद्वारे देशसेवेचे आणि कृषी विकासाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमास लॉयन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा, सचिव मंजु श्रीमाली, प्रकल्प प्रमुख मोहन राठोड, श्रुती खिस्ते, झोन चेअरपर्सन राजेश लुणीया, सदस्य बळीराम बेंद्रे, द्वारकादास मुदंडा, सुरेश मुथा, राजेश खिस्ते, अतुल लड्ढा, जयप्रकाश श्रीमाली, प्रकाश कुंडलकर, भगवान वानखेडे, परतुर क्लबचे सदस्य मनोहर खालापुरे, संजीवनी खालापुरे, कैलास तांगडे, तृप्ती तांगडे आदींची उपस्थिती होती. उपस्थितांनी गांधीजी आणि शास्त्रीजींच्या आदर्शांवर चालण्याची प्रतिज्ञा घेतली.

## श्रीराम वाचनालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती जालना येथील ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय येथे दि ०२ ऑक्टोबर २०२४ रोजी साजरी करण्यात आली.

ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे सचिव श्रीकांत शेलगावकर व नूतन विद्यालयाचे शिक्षक व वाचनालयाचे वाचक माधव ढाकणे यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री याच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मनोगत व्यक्त करतांत माधव ढाकणे म्हणाले कि, महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे देशाच्या जडण घडणीत मोलाचे योगदान आहे. भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी महात्मा गांधीजींनी सत्य,अहिंसा ही दोन शत्रे दिली. शेतकरी आणि सैनिक हेच भारताचे सुरक्षण आणि संवर्धन करू शकतील यावर लालबहादूर शास्त्री यांनी कटाक्ष टाकलेला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितचे आभार शैलेंद्र बदनापुरकर यांनी मानले. याप्रसंगी धोंडीराम पाजणकर, जयपाल सिंग रावत, बद्रीप्रसाद सोनी, शाहीर बाबुसेवा राठोड, प्रतिमेश शेलगावकर, कीर्ती पुराणिक, अश्विनी भाले, वल्लभ शेलगावकर यासह वाचकवर्ग उपस्थित होता.

## विष्णू ढवळे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



**परतूर । प्रतिनिधी -** जालना जिल्हा परिषदेच्या उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना शिक्षक दिनी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. यंदा प्राथमिक गटातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कन्या परतूर या शाळेचे मुख्याध्यापक विष्णू ढवळे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. जालना जिल्हा परिषदेच्या वतीने प्राथमिक, माध्यमिक आणि कला शिक्षक या गटातून प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची पुरस्कारासाठी निवड केली जाते. परतूर तालुक्यात प्राथमिक गटातून विष्णू ढवळे, माध्यमिक गटातून अनिल माणकेश्वर आणि कला शिक्षक गटातून विलास जाधव यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दया काटे, भगवानराव मोरे, रमाकांत बरीदे, जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक गणेश राठोड यांच्या वतीने मुख्याध्यापक विष्णू ढवळे यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

## डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी



**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी महात्माजींच्या शिकवणीप्रमाणे तीन बंदरची वेशभूषा करून सामाजिक संदेश दिला तसेच चौथा बंदर म्हणून मोबाईलचा वापर करणारा बंदर दाखवण्यात आला तसेच मोबाईल वापराचे दुष्परिणाम याबद्दल संदेश दिला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीमती कुकडे विद्या, श्रीमती सय्यद नसरीन, श्रीमती पाटील भाग्यश्री, श्रीमती काळे साधना, श्रीमती उबाळे वंदना, श्रीमती वायाळ शारदा, शेळके गजानन इत्यादींनी मेहनत घेतली.

## अविष्कार गायकवाड यांची तळाशेत जिल्हा परिषद युवासेना विभाग अधिकारी पदावर नियुक्ती

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे संस्थापित शिवसेना, शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना नेते युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशानुसार सुधीर ढाणे महाराष्ट्र राज्य विस्तारक यांच्या सूचने नुसार युवा सेना रायगड जिल्हाधिकारी चेतन गजानन पोटफोडे, जिल्हा चिटणीस डॉ. परेश उभारे, तालुका प्रमुख गजानन अधिकारी, माणगाव नगर पंचायतीचे नगरसेवक शिवसेनेचे अजित तार्लेकर, युवासेना माणगाव तालुका अधिकारी श्री रणजित मालोरे, शहर प्रमुख अजिंकेश जाधव, अभिजीत घोणे, इब्राहिम करेल, ऋषिकेश मोरे, अथर्व हाटे, हार्दिक काटे आणि विभाग अधिकारी, शाखा प्रमुख, युवा सैनिक यांच्या उपस्थितीत बोरघर गावचे उच्च शिक्षित पदवीधर तरुण तडफदार युवा नेतृत्व अविष्कार आकाराम गायकवाड यांची युवा सेना विभाग अधिकारी तळाशेत जिल्हा परिषद या पदावर नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि युवा सेनेच्या माणगाव, इंदापूर, खरवली, पेण, आमडोशी, बोरघर या विभागात आनंदाचे उत्साहाचे आणि युवा सेनेत जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बोरघर येथील नवतरुण, तरूण तडफदार उच्च शिक्षित पदवीधर युवा नेतृत्व अविष्कार आकाराम गायकवाड यांची तळाशेत जिल्हा परिषद युवा सेना विभाग अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याने उपरोक्त इंदापूर माणगाव, खरवली, पेण, आमडोशी, बोरघर शिवसेना युवासेना कार्यक्षेत्रात आणि सदर विभागात आनंदाचे आणि उत्साहपूर्ण युवा जल्लोषाचे वातावरण निर्माण झालेले दिसून येत आहे.

बोरघर गावचे तरुण तडफदार पदवीधर युवा नेतृत्व अविष्कार आकाराम गायकवाड यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्या युवा सेना विभाग अधिकारी तळाशेत जिल्हा परिषद या पदावर नियुक्ती झाल्याचे समजताच अविष्कार गायकवाड यांच्यावर यांच्या महाविद्यालयीन विराट मित्र परिवार व मित्र मंडळातून आणि आप्त परिवारातून त्यांना प्रत्यक्ष भेटून आणि सोशल मीडियाच्या वॉट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्राम आदी माध्यमांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव सुरू झाला आहे.

## पत्रकार नितीन चव्हाण यांचे निधन



**मुंबई -** समाजातील शेवटचा घटक,दुर्बल लोकांसाठी आपली लेखनी झिजविणारे झुंजार पत्रकार नितीन शांताराम चव्हाण ( वय ५३ ) यांच्या पार्थिवावर दुपारी विक्रोळी पूर्व येथील टागोरनगर स्मशानभूमीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. दिर्घ आजाराने त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी पूजा, एक मुलगा ऋषिकेश, एक मुलगी वैष्णवी आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारास त्यांचा शालेय महाविद्यालयीन मित्र परिवार, विविध वृत्तपत्रे, वाहिन्यांचे पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांचा दशक्रिया विधी १० ऑक्टोबर रोजी शिवाजी पार्क जवळ सकाळी ७.३० होणार आहे. तर तेरावे हे १३ ऑक्टोबर त्यांच्या घरी विक्रोळी पश्चिम, सेंट जोसेफ चर्चच्या मागे, हिल व्हू सोसायटी, तिसरा मजला फ्लॅट क्रमांक २१ येथे होणार आहे. सध्या ते महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात कार्यरत होते. त्या अगोदर त्यांनी सामना, तरुण भारत, सकाळ वृत्तपत्रांत पत्रकार, वार्ताहर म्हणून काम केलेले आहे. गेले २७ वर्षे ते पत्रकारितेत होते.

शिवसेना दलित आघाडीचा मेळावा

## शिवसेनेस २० टक्के अधिक मतदान मिळवून देणार- ॲड. भास्कर मगरे



**जालना | प्रतिनिधी -** शिवसना दलित आघाडी जालना विधानसभा मतदार संघातून शिवसेनेस वाढीव २० टक्के मतदान मिळवून देणार असल्याचा विश्वास शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी बोलून दाखविला.

जालना विधानसभा मतदार संघातील शिवसेना दलित आघाडीच्या समर्थकांचा मेळावा १ ऑक्टोंबर रोजी घेण्यात आला. यावेळी शिवसेना दलित आघाडी समर्थकांची मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख तथा दलित आदिवासी नेते ॲड. भास्कर मगरे यांच्या अध्यक्षतेखाली मेळाव्यात बोलतांना ॲड. भास्कर मगरे म्हणाले की, काल शिवसेना दलित आघाडीच्या वतीने मी स्वतः लाक्षणिक उपोषण केले. त्या उपोषणप्रसंगी माजीमंत्री शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी भेट देवून मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याशी बोलणे झाले. मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी प्रशासनाला दिलेले आदेशाची जिल्हा प्रशासनानी अंमलबजावणी करावी आणि यासंदर्भात १० ऑक्टोंबर रोजी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, ॲड. भास्कर मगरे यांची यासंदर्भात बैठकीचे आयोजन करणत आले आहे.

शिवसेना दलित आघाडीचे जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघ निहाय मेळाव्याचे आयोजन झाले आहे. १ ऑक्टोंबर रोजी जालना विधानसभा मतदार संघातील जालना येथील मेळाव्यात प्रचंड असा प्रतिसाद मिळाला असून जालना विधानसभा मतदार संघात शिवसेना दलित आघाडी २० टक्के मतदान देणार असल्याचा विश्वास शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख तथा भुमिहिन आदीवासी कास्तकरांचे नेते ॲड. भास्कर मगरे यांनी बोलून दाखविला. यावेळी शिवसेना दलित आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# असलम शाह समाज भूषण पुरस्कारांने सन्मानित



**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी** - ज्यांच्या नावातच झुंज देऊन समाजास जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आहे त्याचं वर्तमापत्राद्वारे वंचित, शोषित घटकांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न केले जातात हे पाहता खरचं झुंजार जनता काम हे नावाप्रमाणेच झुंजार असल्याचे प्रांजळ मत डॉ. पूजा पिसे यांनी लोकप्रिय दैनिक झुंजार जनता च्या वर्धापदिनानिमित्त आयोजित सन्मान कर्तृत्वाचा, सत्कार सोहळा मान्यवरांचा या शाही समारंभात त्या आपल्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. पुढे त्या म्हणाल्या की, अतिशय कमी वेळात वाचकांच्या पसंतीस उतरलेले हे दैनिक आपली लोकशाहीत भूमिका स्पष्ट बजावत आहे हे पाहून समाधान वाटते आहे. या वर्तमान पत्राचे मुख्य संपादक इस्माईल शेख साहेब आणि त्यांची सर्व टीम यांच्या प्रामाणिक कार्यामुळेच आज हे वर्तमान पत्र राज्याच्या अतिशय कानाकोऱ्यात गेले आहे. कार्यक्रमाची सुरुवात मुफ्ती अब्दुल रहमान अशरफी यांनी कुराण पठण करून केली, तर अध्यक्षीय भाषणात राजाभाऊ देशमुख यांनी पत्रकारिता करणे, एखादे वर्तमान पत्र चालवणे हे एवढे शक्य काम नाही पण इस्माईल शेख यांनी अतिशय कष्ट आणि मेहनतीच्या बळावर हे वर्तमान पत्र सूरू करुन त्यांचे सातत्य टिकून ठेवले हीच फार महत्त्वाची बाब असल्याची त्यांनी अधोरेखित केली. त्याचबरोबर इथे असलेल्या पत्रकारांनी सुद्धा आपली लोकशाहीतील भूमिका महत्त्वाची कशी आहे हे समजून घेऊन पत्रकारिता क्षेत्रात योगदान द्यावे असे आवाहन केले. तसेच या वर्तमानपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त उद्घाटनाचा मान एका महिलेला देऊन इस्माईल शेख यांनी समाजास एक वेगळा संदेश दिला असल्याची आवर्जून सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, उद्घाटक श्रीमती पूजा पिसे, प्रमुख उपस्थिती अब्दुल रहमान अशरफ़ी, विकास जाधव, केशव पाटील जंजाळ, इंद्रजीत भैय्या देशमुख, गणेश ठाले, इमरान कुरेशी, एडवोकेट डी एस जाधव, अंकुश पाटील, नीलम उद्योग समूहाचे इकबाल शेख,आसेफ अबरार खान,फरमान कुरेशी, अंकुश जाधव, दिलीप कड पाटील, जी टी वाघ, सर्व प्रतिनिधी वार्ताहर व मित्रपरिवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्र संचालन असलम शाह यांनी केले तर प्रास्ताविक मुख्य संपादक इस्माईल शेख यांनी तर आभारप्रदर्शन सागर घोडके यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य... प्रवीण दळवी, भूषण चव्हाण, दिनेश पडोळ गुणाजी चाकोते, मारुती कुडकेवार, सुनील मारकल, पठाण फिरोज खान अक्रम खान, अरुण डाखोरे यांनी केले तर आयोजन समिती मध्ये इस्माईल शेख, सागर घोडके, संतोष डवरे, आकिब शेख फ़िरोज़ पठान, अक्रम खान आदींचा सहभाग होता.या निमित्त समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली त्या मान्यवरांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यात असलम शाह, संजय माझळकर, राजू बुलबुले, ड. सय्यद इर्शाद शादुल पटेल... आदींचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी झुंजार जनता या वर्तमान पत्रात उत्कृष्ट पत्रकारिता केल्या बद्दल आकिब शेख, सागर घोडके, संतोष डवरे, गुणाजी चाकोते, मारोती कुडकेवार , सुनिल मारकळ आदींचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

याबद्दल त्यांचे नऊवारक शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष त आदर्श शिक्षक शेख जमीर सर, प्रसिद्ध चित्रकार संतोष बाबुराव औटी, प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्राची जाफराबाद तालुका अध्यक्ष शेख अशपाक, उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, विनोद कळंबे, नसीम शेख, आदींनी अभिनंदन केले आहे. या कार्यक्रमात सूत्र संचालन करणारे असलम शाह यांनी आपल्या बहारदार आणि काव्य मैफिलीचा साज चढवत सूत्र संचालन करत उपस्थिताची मने जिंकली हे विशेष.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.